Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 9, Sept - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Received on : 05/09/2021 Accepted on : 20/09/2021 Publication Date: 30/09/2021

# भारतातील निवडणुक सुधारणांचे विश्लेषणात्मक अध्ययन

**सहा. प्रा.नासीर कासम शेख**
श्री.विठ्ठल रुक्मिणी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सवना ता.महागांव जि.यवतमाळ (महाराष्ट्र)
Email - nasir.sheikh313@gmail.com

**सारांश :** भारतीय निवडणुक आयोगाने अलिकडच्या काळात म्हणजेच 1992 सालापासुन पुर्वीच्या काळी होणारे मतदान हे मतपत्रिकेवर केले जात होते. त्यामुळे मतदानामध्ये गैरप्रकार होऊ लागले आणि मतदानाचा निकाल सुध्दा उशिरा लागु लागला. एक प्रकारे मतदानामुळे निकाल लागण्याकरीता विलंब होऊ लागला.

1992 सालानंतर ईव्हीएम (EVM) चा प्रयोग प्रायोगिक तत्वावर करण्यात आला आणि 1993 ते 1999 च्या सार्वत्रीक निवडणुकीमध्ये ईव्हीएम (EVM) यंत्राचा मतदान घेण्याकरीता वापर सुरु झाला. त्यामुळे मतपत्रिके ऐवजी EVM मशीन मतदान घेण्यासाठी उपलब्ध झाल्यामुळे मतदानाचा टक्का वाढला आणि मतदानाचा निकाल सुध्दा वेळेवर लागु लागला. अतिशय महत्वाची सुधारणा निवडणुक आयोगाने केली आहे.

परंतु कालांतराने ईव्हीएम मशीन वर होणारे मतदान हे संशयास्पद होवु लागले असा संशय मतदानांच्या मनामध्ये निर्माण होऊ लागला. म्हणजेच मतदाराने मत दिले एका उमेदवाराला परंतु ते मत जात होते दुसऱ्याच उमेदवाराला अशा प्रकारचा संशय ईव्हीएम यंत्रामुळे मतदारांमध्ये निर्माण झाला.

तसेच विविध राजकीय पक्षांचे सुध्दा म्हणणे असे होते की, ईव्हीएम मशीन हे हॅक केल्या जाऊ शकते. त्यामुळे पुर्वीचीच मतपत्रिका निवडणुका घेण्याकरीता वापरण्यात यावी अशी मागणी केली आहे. भारतीय निवडणुक आयोगाने वारंवार राजकीय पक्षांना आणि मतदारांना ईव्हीएम मशीन कशी सुरक्षित आहे हे सिध्द करुन दाखविले आहे. यावरुन असे दिसुन येते की भारतीय निवडणुक आयोगाने लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये होणाऱ्या निवडणुका कशा पारदर्शी व नि:पक्षपणे पार पाडता येतील. याकरीता केलेल्या सुधारणा मुळे लोकशाही शासन व्यवस्था अधिक बळकट होईल.

## 1. प्रस्तावना :-

निवडणूक आणि लोकशाही शासनव्यवस्था मध्ये निवडणुकीला अतिशय महत्त्व असते निवडणूक आणि लोकशाही या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत कोणत्याही देशातील लोकशाहीचे भवितव्य तेथे होणाऱ्या पारदर्शी व निष्पक्ष निवडणुकांवर अवलंबून असते जर सार्वत्रिक निवडणुका हे योग्यरीत्या पार पडल्या नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्था ही पूर्णपणे संकटात सापडते भारतामध्ये स्वतंत्र व निष्पक्ष निवडणुकांसाठी अनुच्छेद 324 मध्ये स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद भारतीय संविधानामध्ये करण्यात आली आहे.

आतापर्यंत भारतामध्ये लोकसभेच्या सतरा सार्वत्रिक निवडणुका आणि विविध राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका यशस्वीरित्या संपन्न झाल्या आहेत सर्वात मोठी लोकशाही शासनव्यवस्था असलेल्या भारतामध्ये निवडणुका अधिक पारदर्शी व निष्पक्षपणे होण्यासाठी वेळोवेळी भारतीय निवडणूक आयोग भारतीय शासन आणि न्यायालयाने सुधारणा घडवून आणल्याचे प्रत्ययास येते मतदाराच्या मनातील गरज ओळखून त्याला योग्य न्याय देण्याचे काम निवडणूक आयोग आणि न्यायालयाने केलेले आहे.

निवडणूक सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी विविध आयोग आणि समित्याची नेमणूक करण्यात आलेली आहे 1974 मध्ये जयप्रकाश नारायण आणि तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती दिनेश गोस्वामी समिती 1990 न्यायमूर्ती व्ही.के. कृष्ण अय्यर समिती 1994 इंद्रजित गुप्ता समिती 1998 न्यायमूर्ती कुलदीपसिंग समिती इत्यादी समित्यांची नेमणूक निवडणूक सुधारणा करण्या संबंधी करण्यात आली होती वरील सर्व समित्यांनी निवडणुक करण्यासंबंधी महत्त्वाच्या सुधारणा सुचविल्या होत्या त्यामधील काही सुधारणा प्रत्यक्षात अंमलात आणलेल्या आहेत.

अलीकडच्या काळात निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रिया संबंधी महत्वपूर्ण बदल केल्याचे दिसून येते पूर्वीच्या काळी मतेपत्रिके ऐवजी आता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर निवडणूक घेण्याकरिता करण्यात आला आहे कारण पूर्वीच्या काळी मतदानामध्ये होणारी गडबड किंवा गैरप्रकार या प्रकाराला आळा घालण्याकरीता निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र निवडणुका घेण्याकरिता उपयोगात आणलेली आहे. एवढेच नाही तर अशा किती तरी सुधारणा निवडणुक आयोगाने केलेल्या आहेत. या सर्व सुधारणा निवडणुक प्रक्रियेशी आणि मतदार वर्तनाशी संबंधीत असुन तसेच लोक प्रतिनिधी करीता पण सुधारणा निवडणुक आयोगाने केलेल्या आहेत. परंतु प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये ईव्हीएम विषयीची सुधारणा ह्या संबंधीचे अध्ययन करण्यात येणार आहे.

**2. संशोधन विषयाचे महत्व :-**

पुर्वीच्या काळी मतदान प्रक्रिया अतिशय किचकट व कठीण प्रकारची पध्दत होती. मतदानाच्या वेळी मतदानामध्ये गैरप्रकार जास्त प्रमाणामध्ये होत असे. कारण मतदानामध्ये होणारा घोळ आणि मतदानाच्या वेळी होणाऱ्या गैरप्रकाराला आळा घालण्याकरीता निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र याचा वापर निवडणूका घेण्याकरीता केलेला आहे. कारण मतदानाचा निकाल हा अतिशय जलदरित्या या यंत्रामुळे होऊ लागला. तसेच मतदानामध्ये होणारे गैरप्रकार याला आळा बसण्याकरीता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र उपयुक्त ठरलेले आहे. म्हणुन लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये निवडणुका ह्या यशस्वीपणे व नि:पक्षपणे पार पाडण्याकरीता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र उपयुक्त व महत्वपुर्ण ठरत आहे.

**3. संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

1) निवडणुक सुधारणा समित्या किंवा आयोगाने सुचविलेल्या शिफारशीचा अभ्यास करणे.
2) निवडणुक प्रक्रियेशी संबंधीत केलेल्या सुधारणांचा अभ्यास करणे.
3) ईव्हीएम यंत्राच्या वापराबाबत मतदाराच्या मनामध्ये निर्माण झालेल्या संशयाबाबतचे अध्ययन करणे.
4) मतदारांना उपलब्ध् करुन दिलेल्या NOTA (None of the Above) या पर्याया बाबत मतदारांचे मत जाणुन घेणे.

**4. संशोधनाची गृहितके :-**

1) ईव्हीएम यंत्राविषयी मतदारांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाल्याचे आढळते.
2) न्यायालयीन निर्णयामुळे भारतीय मतदारांना नोटा चा पर्याय उपलब्ध् होऊन मतदानाचे प्रमाण वाढल्याचे आढळून येते.
3) मतदारांमध्ये VVPAT (Voter Verifiable Paper Audit Trail) विषयी पाहिजे तेवढी जागृती दिसुन येत नाही.
4) निवडणुक सुधारणा समित्यांनी सुचविलेल्या बहुतांश शिफारशी अजुनही अंमलात आणल्या नाहीत.

**5. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

भारतातील निवडणुक सुधारणांचे विश्लेषणात्मक अध्ययन या विषयाचे अध्ययन करतांना भारतातील निवडणुक सुधारणांचे विश्लेषणात्मक पध्दतीने अध्ययन केले जाणार आहे. अलीकडील काळात मतदारांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदान करण्याकरीता उपलब्ध् करुन देण्यात आलेले आहे. त्याच बरोबर मतदारांना (NOTA) नोटाचा पर्याय सुध्दा उपलब्ध् करुन दिला आहे. शिवाय मतदाराला मतदानाची खात्री होण्याकरीता (VVPAT) व्हीव्हीपॅट संबंधीची सुधारणा करण्यात आली आहे. म्हणुन नोटाविषयी असलेले मत व व्हीव्हीपॅट विषयी मतदारांमध्ये असलेली जागृती चा संबंधीचे अध्ययन प्रस्तुत प्रबंधामध्ये केले जाणार आहे.

**6. संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करण्याकरीता विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. प्रस्तुत प्रबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक व व्दितीय साधनाचा वापर केला जाईल. तसेच सर्वेक्षण करुन मुलाखतीच्या माध्यमातुन प्रस्तुत विषयाचे तथ्य संकलन केले जाईल.

**ईव्हीएम बद्दल जाणुन घेऊ :-**

ईव्हीएम म्हणजेच इलेक्ट्रॉनिक वोटींग मशीन पुर्वीच्या काळी मतदान साठी असणाऱ्या मतपेट्या कालबाह्य होऊन आता मतदानासाठी आणि निकाल मोजण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वोटींग मशीन (EVM) या आधुनिक उपकरणाचा मतदान घेण्यासाठी वापर निवडणुक आयोगाने सुधारणा करुन उपलब्ध केला आहे.

1977 साली ईव्हीएम विषयीचा प्रस्ताव मांडल्या गेला, 1979 मध्ये पहिल्यांदा ईव्हीएम तयार करण्यात आले. 6 ऑगष्ट 1980 ला सर्वप्रथम ईव्हीएम (EVM) चे प्रात्याक्षिक सर्व पक्षांना दाखविण्यात आले. आणि देशामधील काही राज्याच्या विधान सभेच्या निवडणुकीकरीता ईव्हीएम चा वापर केरळ, राजस्थान, मध्यप्रदेश या राज्यामध्ये केला आहे.

संपूर्ण देशभरात ईव्हीएम (EVM) मशीनचा वापर 2009 च्या सार्वत्रीक लोकसभेच्या निवडणुकीमध्ये केला आहे. तेव्हापासुन ते आजपर्यंत सार्वत्रीक लोकसभेच्या निवडणूका व राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये ईव्हीएम (EVM) मशीनचा वापर मतदान घेण्याकरीता केला जातो.

**न्यायालयीन निर्णय :-**

लोकशाहीला अधिक बळकट करण्याकरीता नोटा (NOTA) या चिन्हाचा पर्याय मतदारांना देण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या 27 सप्टेंबर 2013 च्या आदेशान्वये सर्व राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेशातील सर्व नागरिकांना नकाराधिकार (नोटा) हा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला. नोटा च्या पर्यायामुळे एखाद्या मतदारांची मतदान करण्याची ईच्छा नसेल तर कोणत्याही

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 9, Sept - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Received on : 05/09/2021 Accepted on : 20/09/2021 Publication Date: 30/09/2021

उमेदवाराला आपले मत द्यावयाचे नसेल तर तो मतदार आपला गोपनियरित्या हक्क नोटा ला मतदान करुन बजावु शकतो. अशा प्रकारची सुधारणा निवडणुक आयोगाने केलेली आहे.

### मतदान पारदर्शकतेसाठी वापरण्यात येणारे VVPAT :-

व्हीव्हीपॅट (VVPAT) हे मशीन एक प्रकारे प्रिंटर होय. यामुळे जेव्हा मतदार आपले मतदान करतो तेव्हा ते कोणत्या व्यक्तीला केले आहे. त्याबाबतची एक छोटी पावती येते. यावरुन मतदार आपण नेमके कोणाला मत दिले आहे मत हे योग्य व्यक्तीलाच गेले आहे की नाही याची खात्री करुन घेवु शकतो याकरीता निवडणुक आयोगाने महत्वाची सुधारणा अलिकडच्या काळात केलेली आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये प्रश्नावलीच्या माध्यमातुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर भारतातील निवडणुक सुधारणांचे विश्लेषणात्मक अध्ययन शोध प्रबंधात केले आहे.

**सारणी क्र. 1**
**ईव्हीएम (EVM) च्या संशया बाबत सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | 25 पेक्षा कमी | 04 | 28.57% |
| 2) | 25 ते 40 | 06 | 35.75% |
| 3) | 40 ते 80 | 10 | 65.12% |
| | एकुण | 20 | 100% |

(स्त्रोत – व्यक्तीगत सर्वेक्षणाच्या आधारावर)

वरील सारणी वरुन स्पष्ट होते की, सर्वाधिक 65.12% हे 40 ते 80 च्या वयोगटातील मतदार आहेत. तर सर्वात कमी 28.57% हे 25 पेक्षा कमी वयोगटातील मतदार आहेत, यावरुन असे स्पष्ट होते की, 40 ते 80 वयोगटातील मतदारांचे ईव्हीएम (EVM) यंत्राविषयी मतदारांमध्ये संशय दिसुन येतो.

**सारणी क्र. 2**
**नोटा या चिन्हामुळे मतदानाचे प्रमाण वाढलेले आहे सारणी**

| अ. क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | नौकरी करणारे मतदार | 10 | 71.44% |
| 2) | मजुरी करणारे मतदार | 02 | 14.28% |
| 3) | इतर | 08 | 14.28% |
| | एकुण | 20 | 100% |

(स्त्रोत – व्यक्तीगत माहितीच्या आधारावर)

वरील तालिकेवरुन वरुन असे स्पष्ट होते की, नौकरी करणारे मतदार हे 71.44% नोटा चिन्हाच्या वापरामुळे मतदानाचे प्रमाण वाढल्याचे सांगतात तर इतर मतदार हे 14.28% नोटा या चिन्हाच्या वापरामुळे मतदानाचे प्रमाण वाढत नाही असे सांगतात.

**सारणी क्र. 3**
**व्हीव्हीपॅट विषयी मतदारांमध्ये असलेली जागृती विषयी सारणी**

| अ. क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | 20 पेक्षा कमी | 04 | 28.58% |
| 2) | 30 पेक्षा जास्त | 06 | 42.86% |
| 3) | 60 पेक्षा जास्त | 10 | 28.56% |
| | एकुण | 20 | 100% |

(स्त्रोत – व्यक्तीगत माहितीच्या आधारावर)

वरील सारणीवरुन वरुन असे स्पष्ट होते की, 20 पेक्षा कमी मतदार हे व्हीव्हीपॅट (VVPAT) या यंत्राविषयी जागृत नाहीत. तर सर्वाधिक 30 पेक्षा जास्त मतदार हे व्हीव्हीपॅट (VVPAT) या यंत्राविषयी 42.86% जागृत दिसुन येत नाही. म्हणुन मतदारांमध्ये व्हीव्हीपॅट (VVPAT) या यंत्राविषयी पाहिजे तेवढी जागृती असल्याचे दिसुन येत नाही.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 9, Sept - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Received on : 05/09/2021 Accepted on : 20/09/2021 Publication Date: 30/09/2021

**सारणी क्र. 4**
**निवडणुक सुधारणा समित्यांनी सुचविलेल्या शिफारशी संबंधी सारणी**

| अ. क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | निवडणुक सुधारणा समित्यांनी शिफारशी सुचविलेल्या प्रत्यक्षात अंमलात आणल्याद आहेत. | 12 | 60.00% |
| 2) | निवडणुक समित्यांनी सुचविलेल्या शिफारशी प्रत्यक्षात अंमलात आणल्या नाहीत. | 08 | 40.00% |
| | **एकुण** | **20** | **100%** |

वरील सारणीवरुन वरुन असे स्पष्ट होते की, भारतीय निवडणुक सुधारणा समित्यांनी सुचविलेल्या शिफारशी प्रत्यक्षात अंमलात आणल्याचे 60% प्रमाण दिसून येते तर भारतीय निवडणुक सुधारणा समित्यांनी सुचविलेल्या शिफारशी पैकी प्रत्यक्ष अंमलात आणल्या नाहीत त्याचे 40% प्रमाण दिसून येते.

### संदर्भ ग्रंथ सुची :-

1. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपुर, आवृत्ती, 1992.
2. घाटोळ रा.ना., सामाजिक संशोधन तत्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपुर, आवृत्ती-2003
3. जरारे व्ही.एल., संशोधन प्रणाली, अव्दैत प्रकाशन ,अकोला आवृत्ती-2004.
4. बोरुडे रा.र., -संशोधन पध्दती शास्त्र पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन आवृत्ती 1999.
5. अलाणी विवेक, सामाजिक संशोधन पध्दती, आवृत्ती-1999.
6. बोधनकर सुनिल, सामाजिक संशोधन पध्दती, दुसरी आवृत्ती, 1999.
7. भाडारकर पी.एन., सामाजिक संशोधन पध्दती, दुसरी आवृत्ती, 1987
8. भोळे डॉ. भा.ल., भारताचे शासन आणि राजकारण-पिंपळापूरे प्रकाशन नागपुर, 2011.
9. भोळे डॉ. भा.ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे प्रकाशन नागपुर, 2018.
10. भोळे डॉ. भा.ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे प्रकाशन नागपुर, 2005.
11. गोडबोले माधव, भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरिक्षा, राजहंस प्रकाशन पुणे.
12. लोटे रा.ज., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे प्रकाशन नागपुर, 2009.
13. देशमुख डॉ.अलका, भारतीय शासन आणि राजकारण, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपुर, 2009.
14. व्होरा राजेंद्र, भारतीय लोकशाही, डायमंड पब्लिशर्स ,नागपुर, 2009.
15. पाटील बी.बी., भारताचे शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 1999.
16. जोगदंड डॉ.बी.जी., भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्थानिक स्वशासन, मेहेरबाबा पब्लिशर्स, नागपुर, 2018.
17. विघे डॉ.प्रशांत, भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्थानिक स्वशासन, साईनाथ प्रकाशन, नागपूर 2017.
18. चव्हाण डॉ.शंकर, भारतीय शासन आणि राजकारण, प्रतिमा पब्लिकेशन, पुणे.
19. शिंदे डॉ.सुनिल, ढवळे डॉ. जयराम, भारतीय शासन आणि राजकारण, एज्युकेशन पब्लिशर्स.
20. जोशी डॉ. सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपुर, 2002.